4 थी दक्षिण अशियाई स्वच्छता परिषद
"स्वच्छता जीवनाचा दर्जा उंचावते"
4 ते 7 एप्रिल 2011
कोलंबो, श्रीलंका

# कोलंबो जाहिरनामा

आम्ही अफागाणिस्थान, बांग्लादेश, भुतान, भारत, मालव्दीप, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंकेचे प्रमुख प्रतिनिधी कोलंबो, श्रीलंका येथे 4 ते 7 एप्रिल 2011 रोजी झालेल्या 4थ्या दक्षिण आशियाई स्वच्छता परिषदेमध्ये सहभागी झाले होतो आणि तसेच या परिषदेमध्ये सहभागी झालेले मंत्री, जेष्ठ सरकारी नोकरदार, तळागाळातील कार्यकर्ते व समाज प्रतिनीधी, विभागीय संस्थेमधील व्यवसायिक, शैक्षणीक संस्था, सार्वजनिक संस्था, अशासकिय संस्था व विकसीत भागीदार, खाजगी संस्था व शालेय विदयार्थी आम्ही कबुल करतो कि,

1. दक्षिण आशियामध्ये आरोग्य आणि स्वच्छता या विषयीची परिस्थिती बिकट आहे. पुष्कळ लोक असे आहेत की ते उघडयावर शौचास बसतात किंवा ते असुधारीत स्वच्छतागृहाचा वापर जास्त प्रमाणात करतात. (SACOSAN च्या शेवटच्या मिटींग पर्यत). दक्षिण आशियामध्ये अतिसाराच्या आजारामुळे सुमारे 7,50,000 मुले दगावली आहेत, कि जे प्रखरपणे निकृष्ट स्वच्छते विषयी संबंधीत आहेत.

2. समाजाला स्वच्छतेच्या महत्वांविषयी सशक्तीकरण करणे हा विकासाचा पहीला मुद्दा आहे असे आम्ही मानतो.

3. हया बिकट परिस्थितीचा सामना करण्यासाठी राजकिय घडामोडी संदर्भात SACOSAN प्रक्रियेचे महत्व आम्ही मान्य करतो. जागतिक पंचवार्षिक योजनांतर्गत चालणा-या स्वच्छता कार्यक्रमाला आम्ही साथ देतो आणि आम्ही मान्य करतो की, ऑक्टोबर 2003 मध्ये ढाका येथे, त्याच बरोबर सप्टेंबर 2006 मध्ये इस्लामाबाद येथे व नोव्हेंबर 2008 मध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या सभेत उत्कृष्ट स्वच्छता आणि आरोग्य यांविषयी मुलभुत तत्वांचा जाहिरनामा आम्ही मान्य करतो.

4. दक्षिण आशियातील सर्व लोकांसाठी स्वच्छता व आरोग्य विषयक योजना व कार्यक्रम पुर्नरुपी देण्यासाठी आम्ही एकत्रितपणे कटिबद्ध आहोत.

त्याचबरोबर आम्ही एकत्रीतपणे हया नुतनिकरणासंदर्भात मान्यता देवून त्यासाठी आम्ही वचनबदध आहोत.

1. अलिकडच्या काळातील युनायटेड नेशन्समध्ये झालेल्या स्वच्छतेच्या हक्कांविषयी झाालेल्या ठरावाच्या प्रकाशझोतात विकासत्मक काम करण्यासाठी व हया विषयी जाणीव व्हावी हया दृष्टीने कार्यक्रमात व प्रकल्पात आणि सरतेशेवटी कायदेशीर बाबींचा अंतर्भाव हया विषयी मान्यता झाली.

2. SACOSAN च्या मागील सर्व योजना आणण्यासंदर्भात कालबद्ध योजना तयार करणे आणि उपलब्ध साधानांचा पुरेपुर वापर करुन योजना गतिशील करण्यासाठी आम्ही वचनबदध आहोत.
3. सर्वसमावेशक स्वच्छता व आरोग्य कार्यक्रमाचा समावेश असलेला निश्चित व योग्य असा मसुदा/आराखडा तयार करणे, तळागाळातील व दारीद्रय रेषेखालील समुह, ग्रामीण व शहरी भागातील लोकांचा समावेश असलेला व ज्यामध्ये हया कार्यक्रमासाठी आवश्यक असणा-या आर्थिक गरजेविषयी स्पष्टपणे नमुद केलेले असेल की ज्यांना त्याची जास्त गरज भासते. हे करत असतांना हे सुदधा लक्षात घ्यावे लागेल की पर्यावरणाचे संरक्षण आणि वातावरणातील/हवामानातील बदल व आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये दयावा लागणारा प्रतिसाद हया विषयी आव्हाने असतील.
4. प्रत्येक शैक्षणिक पातळीवरील कार्यरत असणारी, प्रत्येक नविन किंवा अस्तित्वात असलेल्या शाळेमधील स्वच्छता विषयीचे उददीष्ट भित्तीचीत्र/ रेखाचित्राची उभारणी करण्याविषयीची खात्री करणे की ज्यामध्ये लहान मुलांसाठी योग्य स्वच्छतागृह, मुलींसाठी व मुलांसाठी वेगवेगळे स्वच्छतागृह की ज्यामध्ये मासिक पाळी मधील दिवसांमधील स्वच्छतेविषयी असणारी सुविधा उपलब्ध केलेली असेल.
5. स्वच्छता व आरोग्य विषयक समन्वय साधण्याची जबाबदारी असलेली एक राष्ट्रीय पातळीवरील समिती स्थापन करणे की ज्यामध्ये सर्व लाभार्थींचा समावेश असेल. परंतु आर्थिक, आरोग्य विषयक, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण, पाणी, शिक्षण, लिंग आणि राष्ट्रातिल स्थानिक सरकारी, निमसरकारी आणि स्थानिक पातळी या विषयीची जबाबदारी असलेल्यांपुरतीच मर्यादीत नसावी.
6. स्वच्छता आरोग्य कार्यक्रमांतर्गत आवश्यक असणा-या विशिष्ट सार्वजनिक विभागाच्या अंदाजपत्रकामध्ये आर्थिक तरतुद करणे.
7. स्वच्छता आणि आरोग्य विषयक कार्यक्रमासाठी आवश्यक असणा-या आर्थिक तरतुदीमध्ये सुधारीत वाढ करणे.
8. आरोग्यविषयक कार्यक्रमासाठी लोकांच्या स्वतःच्या सहभागाचे महत्व पटवुन देणे व त्यासाठी आवश्यक असणा-या योजना व कार्यक्रमासाठी आवश्यक असणारी गुंतवणुक करण्यासाठी समाजाचे सशक्तीकरण करण्याची खात्री करणे आणि गरीब लोकांच्या संरक्षणासाठी त्यांना स्वत;च्या स्वच्छते विषयीच्या उपाय योजनांचे संयमन करणे.
9. भुमिका व जबाबदा-यांची स्पष्टपणे जाणीव असलेली व देखरेख करणारी यंत्रणा विकसित करुन ही यंत्रणा सर्वमान्य व सर्वसाधारण दर्शकांना प्रमाणित करेल आणि निष्पत्तीचा अहवाल सादर करेल की ज्यामध्ये प्रत्येक स्तरावरील घरातील व्यक्तींचा व समाजाचा समावेष असेल आणि ही यंत्रणा तळागाळातील व अरक्षित समुहासाठी आलेल्या निष्पत्तींचा अहवाल विभागुन देण्याची परवाणगी देईल.
10. शाळेमधील स्वच्छता, हातधुणे व मासिक पाळीतील स्वच्छता या विषयीचे विशिष्ट उच्च अग्रक्रम असणारी प्रमाणित केलेले दर्शकांचा समावश देखरेख करणा-या यंत्रणेमध्ये असावा.
11. सामाजिक स्तरावरील विशेषतः अति तळागाळातील आणि अरक्षित समुहाकरीता तयार झालेले स्वच्छता व आरोग्य कार्यक्रमांतर्गत योजना तयार झाल्यापासुन कार्यान्वित होईपर्यत सहभाग व समावेश आणि सामाजिक जबाबदारी असलेल्या यंत्रणेचा अंगिकार करावा.
12. उच्च शिक्षणाच्या सुविधांचा अंतर्भाव, विकसीत आभ्यासक्रम, संशोधन व विकास, ज्ञान विनिमय आणि विकासाची भागीदारी या सर्व गोष्टींचा समावेश करुन स्वच्छता आणि आरोग्य कार्यक्रम कार्यान्वित करत असतांना कार्यक्षमता वाढवणे व तीचे मजबुतीकरण करणे.
13. जेव्हा आपण 2 वर्षानी नेपाळमध्ये होणा-या सभेमध्ये भेटु तेव्हा SACOSAN प्रक्रिया प्रभावीपणे सुरु असल्याची खात्री करुन त्याबद्दलचा विशिष्ट अहवाल सादर करण्यासाठी आणि SACOSAN च्या

इतर जबाबदा-या पार पाडण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. त्या वेळी वित्त मंत्रालय, आरोग्य मंत्रालय, शिक्षण मंत्रालय आणि इतर संबंधीत मंत्रालयातुन भविष्यातील सर्व सभेसाठी सहभाग असेल.

14. SACOSAN III मध्ये तयार झालेल्या दिल्लीच्या रस्त्याच्या नकाशाच्या संदर्भात देखरेख आणि कार्यवाहीला उत्तेजन देण्यासाठी देशहीत समोर ठेवुन स्वतःचा अहवाल सादर करणे आणि SACOSAN I मध्ये तयार झालेल्या देशांतर्गत कार्यकारी समुहाची वर्षिक सभा बोलवणे की जी प्रगतीचे मुल्यमापन करेल.

आम्ही पुढे संपर्क करु

- दक्षिण आशियामधील स्वच्छता व आरोग्य कार्यक्रम वाढ होऊन समन्वय साधण्यासाठी त्याच बरोबर स्वच्छता व आरोग्य कार्यक्रम वृदधींगत करण्यासाठी आर्थिक आणि तांत्रीक सहाय्य मिळवण्यासाठी विकसीत बॅंक, बाहेरील मदतकार्य करणा-या संस्था ज्या आमच्या प्रयत्नांना साथ देतील.
- SACOSAN सोबत SAARC या संस्थेला स्वच्छता व आरोग्य कार्यक्रमात जोडणे.
- 2015 सालानंतर नविन पिढीचा विकास करण्याच्या ध्येयाची मांडणी जेव्हा तयार होईल तेव्हा युनायटेड नेशन्स दक्षिण आशियायी विभागाची सत्य परीस्थिती विचारात घेईल आणि WHO/UNICEF च्या एकत्रित देखरेख कार्यक्रमामधील बदल लक्षात घेता, संपुर्ण समाजात होणा-या परिणामाची देखरेख करण्याची गरज व दक्षिण आशियाई विभागात मोठया प्रमाणात वापरात येणा-या सार्वजनिक स्वच्छता गृहांची संख्या लक्षात घ्यावी लागेल.

श्रीलंका सरकारचे व श्रीलंकेतील जनतेचे त्यांच्या उत्कृष्ट रीतीने हा कार्यक्रम पार पाडल्याबद्दल व त्यांनी दाखवलेल्या औदार्य व आदरतितथ्याबद्दल आम्ही त्यांचे भरपुर कौतुक करतो.

कोलंबो, श्रीलंका, 6 एप्रिल 2011.

1. श्री.जेरुल्लाह मनसुरी, मंत्री, अफगाणिस्तान सरकार.
2. श्री. सैद मेहबुब हसन, अतिरीक्त सचिव, ग्रामिण विकास व सहकार मंत्रालय, बांग्लादेश सरकार.
3. श्री.इच्चाराम दुलाल, तज्ञ मंत्रालय, भुतान रॉयल सरकार.
4. श्री. विलासराव देशमुख, मंत्री, भारत सरकार.
5. श्री.मोहम्मद अस्लम, मंत्री, मालदिव सरकार.
6. श्री. टॉप बहाद्दुर रयामाजी, मंत्री.नेपाळ सरकार.
7. श्री.शौकत उल्लाह, इंजिनिअर, मंत्री,पाकिस्तान सरकार.
8. श्री. दिनेश गुणवर्धना, मंत्री, श्रीलंका सरकार.